आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३ मार्च २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त भागात अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांसाठी २ विशेष विमानांची सोय/ खास वॉट्सअ‍ॅप मदत क्रमांक जारी

- जाहिरातींच्या माध्यमातून एसटीचा महसूल वाढवण्याचा निर्णय

- होळी आणि धूलिवंदनाचा सर्वत्र उत्साह

- दहशतवाद विरोधी पथकाचे मुंबई, यवतमाळ आणि अहिल्यानगरमधे छापे

**आणि**

- ऑल इंग्लंड बॅडमिंटन विजेतेपद स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**<><><><><>**

अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षामुळे संयुक्त अरब अमिरातीमध्ये अडकलेल्या राज्यातल्या १६४ जणांना परत आणण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन विमानांची व्यवस्था केली आहे. फुजरौह विमानतळावरून आज दुपारी साडे तीन वाजता एक आणि साडे चार वाजता दुसरं विमानं मुंबईच्या दिशेने उड्डाण करेल, असं उपमुख्यमंत्री कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

पश्चिम आशियाच्या संघर्षग्रस्त भागात अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांसाठी राज्य सरकारने ९७१५ ०३६५ ४३५७ हा आपत्कालीन व्हॉट्सअ‍ॅप मदत क्रमांक जारी केला आहे. दुबईतल्या इंडियन पीपल्स फोरमच्या समन्वयानं राज्य सरकारनं हा क्रमांक जारी केला असून मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस हे स्वतः सातत्याने विविध यंत्रणा आणि केंद्र सरकारबरोबर सातत्याने संपर्क ठेवून आहेत.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबई आणि अबू धाबीहून भारताकडे येणारी विमानसेवा काल रात्रीपासून अंशतः पुन्हा सुरू झाली असून त्यामुळे तिथं अडकलेल्या हजारो भारतीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. दुबई आणि अबू धाबीपासून दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरूकडे काही प्रमाणात विमानसेवा सुरू करण्यात आली. दुबईत अडकलेल्या १४९ प्रवाशांना घेऊन आलेलं एअर इंडियाचं विमान आज सकाळी १० वाजून ५८ मिनिटांनी दिल्ली विमानतळावर उतरलं, तर एमिरेट्स कंपनीचं विमान २१७ प्रवाशांना घेऊन चेन्नई विमानतळावर उतरलं.

भारतातल्या विविध विमानतळांवरुन आखाती देशांकडे जाणारी अनेक उड्डाणं नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं स्थगित केली आहेत.

**<><><><><>**

पश्चिम आशियात वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल सौदी अरेबियाचे युवराज आणि प्रधानमंत्री - मोहम्मद बिन सलमान, बहरिनचे राजे हमाद बिन इसा अल खलिफा तसंच जॉर्डनचे राजे अब्दुल्ला द्वितीय यांच्याशीही मोदी यांनी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि या भागातल्या घडामोडींबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. या कठीण काळात भारतीय समुदायाची काळजी घेतल्याबद्दल त्यांनी तिन्ही राष्ट्रप्रमुखांचे आभार मानले.

**<><><><><>**

पश्चिम आशिया प्रदेशातल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या येत्या ५ आणि ६ मार्च रोजी होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. येत्या गुरुवारपर्यंत परिस्थितीचा आढावा घेऊन ७ तारखेपासून नियोजित असलेल्या परीक्षांबाबत निर्णय घेण्यात येईल, असंही मंडळाने कळवलं आहे.

**<><><><><>**

बळकट अर्थव्यवस्थेमुळे भारत हा जगासाठी आशेचा किरण बनला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अर्थसंकल्पानंतरच्या वेबिनारमधे 'शाश्वत आणि सशक्त आर्थिक प्रगती' या विषयावर ते दूरस्थ पद्धतीने बोलत होते. आज जग परिवर्तनशील आणि विश्वासार्ह भागीदाराच्या शोधात आहे, त्यामुळे भारताला ही एक मोठी संधी आहे, असं मोदी म्हणाले. भारताने अनेक देशांशी मुक्त व्यापार करार केल्यामुळे संधीची दारं उघडली गेल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

**- - - होल्ड बाईट मोदी - - -**

गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याची जबाबदारी सर्वांची असून देशात तयार होणारी उत्पादनं जागतिक दर्जाची असायला हवीत असं ते म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी उद्योजकांना गुंतवणूक करण्याचं तसंच तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचं आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

जाहिरातींच्या माध्यमातून महसूल वाढवण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असून पुढच्या पाच वर्षांत अडीचशे कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळवण्याचं लक्ष्य असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले.

एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीत ते आज बोलत होते. राज्याच्या कानाकोपऱ्यात महामंडळाचे २५१ बस आगार आणि ६१०पेक्षा जास्त बस स्थानकं आहेत. त्यातून दररोज ५० ते ५५ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे जाहिरातदारांसाठी ही एक सुवर्णसंधी असल्याचं सरनाईक यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात आज सर्वत्र धुळवडीचा सण उत्साहाने साजरा केला जात आहे. होळीच्या नावाखाली दारू विक्री, अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सर्वत्र पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

मुंबईत ठिकठिकाणी रंग खेळून होळीचा सण साजरा केला जात आहे. रासायनिक रंगांचा वापर टाळून पर्यावरणपूरक होळी साजरी करूया, असं आवाहन मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी केलं आहे. मुंबईतल्या घाटकोपरमध्ये राजावाडी गार्डन इथं बृहन्मुंबई महानगरपालिकेनं फुलांची होळी' या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं , त्यावेळी त्या बोलत होत्या.

याशिवाय काल राज्यात विविध ठिकाणी परंपरेनुसार होलिका दहन आणि इतर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**जळगावमध्ये** काल सराफ बाजारातील भवानी माता मंदिरासमोर मानाच्या होळीचं पूजन झाल्यावर ८०० गोवऱ्यांची रास रचून होलिकादहन करण्यात आलं.

**जालनामध्ये** धूलिवंदनानिमित्त पारंपरिक ‘हत्ती रिसाला’ मिरवणूक काढण्यात आली. यावर्षी या मिरवणुकीचं यंदाचं १३८वं वर्ष आहे.

धूलिवंदनानिमित्त सार्वत्रिक सुट्टी असल्यानं दोन्ही शेअर बाजार आज बंद आहेत.

<><><><><>

राज्य पोलिसांच्या दहशतवादी विरोधी पथक एटीएसने तीन जिल्ह्यांमध्ये छापे टाकले. आयसीस या दहशतवादी संघटनेशी संबंधित मुंबईत कुर्ला, शिवाजीनगर आणि गोवंडी भागात ही कारवाई करण्यात आली. तर यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यातही छापे टाकण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यात १२ ठिकाणी शोधमोहीम राबवण्यात आली. या कारवाईत ७४ लाख रुपये रोख, तलवारी आणि चाकूंसह अन्य धारदार शस्त्रं जप्त करण्यात आली. ही शस्त्र बाळगल्याबद्दल दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय अनेक कागदपत्रं, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण आणि सीसीटीव्ही कॅमेरेही जप्त करण्यात आले असून त्यांची तांत्रिक तपासणी केली जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यात पुसद आणि उमरखेड भागातल्या १४ संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे.

<><><><><>

वर्षातलं पहिलं खग्रास चंद्रग्रहण आज होत आहे. दुपारी तीन वाजून २० मिनिटांनी ग्रहण स्पर्श होईल, तर संध्याकाळी ६ वाजून ४७ मिनिटांनी मोक्ष असेल. ग्रहणाचा एकूण कालावधी सुमारे तीन तास २७ मिनिटांचा असेल. ईशान्य भारत आणि अंदमान-निकोबार बेटांतील काही भाग वगळता देशात अनेक ठिकाणी चंद्रोदयाच्या वेळी ग्रहण पाहता येईल.

ग्रहणाच्या पार्श्वभूमीवर देशातली अनेक मंदिरं बंद राहतील.

होळी पौर्णिमेला होणाऱ्या चंद्रग्रहणाच्या पार्श्वभूमीवर राज्यातली अनेक तीर्थस्थळं बंद ठेवण्यात आली आहेत. बुलढाणा जिल्ह्यात काही ठराविक नियमांचं पालन करून शेगाव इथलं संत गजानन महाराजांचं देऊळ सुरू ठेवण्यात आलं आहे.

<><><><><>

जागतिक वन्यजीवन संरक्षण दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी यानिमित्त शुभेच्छा दिल्या असून पृथ्वीचं रक्षण करणाऱ्या वन्यजीव आणि वनस्पतींच्या असाधारण विविधतेचं स्मरण हा दिवस करून देतो असं त्यांनी म्हटलं आहे. परिसंस्थेचं जतन करणारी असामान्य विविधता साजरी करण्याचा हा दिवस असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

ऑल इंग्लंड बॅडमिंटन विजेतेपद स्पर्धेला आजपासून इंग्लंडमधे बर्मिंगहॅम इथं सुरुवात होत आहे. भारताचा १२ खेळाडूंचा संघ स्पर्धेत उतरला आहे. पुरुष एकेरीत भारताचा अग्रगण्य खेळाडू लक्ष्य सेनचा सामना पहिल्याच फेरीत चीनच्या शी यू ची याच्याशी होणार आहे.

महिला एकेरीत मालविका बनसोड हिच्यासमोर चीनच्या चेन यूफेई हिचं आव्हान असेल. तर उन्नती हुड्डा हिचा सामना थायलंडच्या पोर्नपावे चोचुवोंग हिच्याशी होणार आहे. पुरुष दुहेरीत भारताची सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी उद्या मलेशियाच्या जोडी विरुद्ध खेळेल.

अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आखाती हवाई क्षेत्र बंद झाल्यानं ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू, दुबईमध्ये अडकली होती, त्यामुळे ती या स्पर्धेत खेळू शकणार नाही. दरम्यान पी व्ही सिंधू मायदेशी सुखरूप परतली आहे.

**<><><><><>**

रायगड जिल्हा परिषदेत भाजप आणि राष्ट्रवादी कांग्रेस एकत्र येऊन सत्ता स्थापन करतील अशी चिन्ह दिसत आहेत. भाजपचा उमेदवार अध्यक्ष तर राष्ट्रवादीचा उपाध्यक्ष होणार असल्याची चर्चा आहे. ही निवडणूक येत्या १२ मार्च रोजी होईल.

जिल्हा परिषदेत सर्वाधिक २१ जागा शिवसेनेने जिंकल्या असल्या तरी त्यांना विरोधी बाकावर बसावं लागेल. राष्ट्रवादी १६ आणि भाजप १५ मिळून जिल्हा परिषदेत बहुमत होत आहे.

**//<><><><><>//**